# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## (पोलीस वार्तापत्र)

## सायंकाळ

---

### दिनांक 11.10.2018 गुरूवार

### (अकस्मात मृत्यु)

**पो.स्टे. गिट्टीखदान, अजनी :**

**1) गिट्टीखदान** – दिनांक 10.10.18 चे 2330 वा ते 11.10.18 चे 0630 वा चे दरम्यान हिरासिंग मंगलसिंग चव्हाण, वय 48 वर्ष, रा. उत्थान नगर, मिलन किराणा स्टोअर्स जवळ, गोरेवाडा रोड, नागपूर हे पो.स्टे. गिट्टीखदान हद्दीत पोलीस मुख्यालय वसाहत, आटा चक्की जवळील निंबुचे झाडाखाली, नागपूर येथे मृत अवस्थेत मिळून आले. याप्रकरणी फिर्यादी सौरभ हिरासिंग चव्हाण, वय 20 वर्ष, याने दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. गिट्टीखदान येथे सपोनि व्ही.व्ही पाटील, 9689949828 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

**2) अजनी** – दिनांक 11.10.18 चे 1000 वा चे सुमारास पो.स्टे. अजनी हद्दीत प्लॉट नं. 86, 9 एकर, चंद्रमनी नगर, नागपूर येथे राहणारे अतुल मधुकर पाटील, वय 31 वर्ष, यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. अजनी येथे पोउपनि पटले 9970871536 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

**3) अजनी** – दिनांक 29.08.18 चे 1100 वा ते 1130 वा चे दरम्यान गजानन अच्युतराव पारसकर, वय 60 वर्ष, रा. जी 25, ए.बी. ब्लॉक, अजनी पोस्ट ऑफीस जवळ, नागपूर हे आपल्या मोटारसायकलने जात असतांना पो.स्टे. अजनी हद्दीत अरियस हॉस्पीटल जवळ, मेडीकल चौक, नागपूर येथे मोटारसायकल स्लिप झाल्याने ते खाली पडून जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता अरियस हॉस्पीटल, नंतर न्युरॉन हॉस्पीटल, नंतर श्युयरटेक हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनां. 10.10.18 चे 2345 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी पो.स्टे. धंतोली येथून आलेल्या 00/18 चे कायमीवरून व फिर्यादी राजेश सुधाकर पारसकर, वय 45 वर्ष, रा. पोलीस नगर, हिंगणा रोड, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. अजनी येथे पोउपनि पटले 9970871536 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

### (ईतर)

**1) आरोपीस न्यायालयातुन झालेली शिक्षा :**

**1) कळमना** – दि 11.10.2018 रोजी मा. डी.जे. 1, श्रीमती विभा पी. इंगळे मॅडम, यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र 81/15 मधील व पो.स्टे. कळमना मधील अप.क. 59/2015 कलम 354(ए)(1),452,506 भादवि या गुन्हयातील आरोपी देवराव कारूजी गजाम, वय 53 वर्ष, रा. प्लॉट नं. 6/38, रघुजी नगर, कामगार कल्याण केंद्राजवळ, नागपूर याचे विरूध्द साक्षी पुरावा अंती गुन्हा शाबीत झाल्याने आरोपीला 1) कलम 354(ए)(1) भादंवि सहकलम 8 पोक्सो ॲक्ट मध्ये 4 वर्ष सक्त मजुरी व 10,000 रू दंड, दंड न भरल्यास 2 महीने शिक्षा, 2) कलम 452 भादंवि मध्ये 4 वर्ष, सक्त मजुरी आणि 5,000 रू दंड, दंड न भरल्यास 2 महीने शिक्षा, 3) कलम 342 भादंवि मध्ये 6 महीने शिक्षा व 1,000 रू

दंड, दंड न भरल्यास 15 दिवस साधी शिक्षा ठोठावण्यात आली आहे. सर्व शिक्षा आरोपीस एकत्र भोगावयाचा आहे. आरोपीस दिनांक 09.02.2015 चे 2000 वा चे सुमारास अटक करण्यात आली होती.

दिनांक 03.02.2015 चे 1730 वा चे सुमारास पो.स्टे. कळमना हद्दीत राहणारी 15 वर्षीय फिर्यादी ही एकटी घरी असतांना आरोपीने पिण्याचे पाण्याचे बहाण्याने घरात प्रवेश करून फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून विनयभंग केला. तसेच कोणाला काही सांगीतल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी फिर्यादी हिने दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. कळमना येथे गुन्हा नोंदविला होता.

सदर गुन्हयात तपासी अधिकारी मपोनि एस.एस वाकोडे, यांनी कोर्टात दोषारोपपत्र सादर केले. सदर गुन्हयात कोर्टात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा फैय्याज खान, नापोशि अनिल दानोडकर यांनी काम पाहीले. तर सदर खटल्यात सरकारी वकील म्हणून ॲड. श्री अभय जिकार, यांनी काम पाहीले तर आरोपीचे वकील ॲड. श्री शर्मा यांनी काम पाहीले.

**<u>2) गुन्हे शाखा युनीट क्र. 2 पथकाची कामगीरी –</u>**

गुन्हे शाखा युनीट क्र. 2 चे अधिकारी कर्मचारी हे कार्यालयात कार्यालयीन कामकाज करीत असतांना गुप्त बातमीदाराकडून प्राप्त माहीतीचे आधरे दोन पंचासह प्लॉट नं. 102, अनंतनगर, राठोड ले आऊट, मधील इमारतीचे पार्कीगचे मोकळया जागेत पो.स्टे. गिट्टीखदान नागपूर शहर येथे छापा कार्यवाही केली असता मिळून आलेले आरोपी क्र. 1) शेख जोयेब वल्द अब्दुल रहमान, वय 37 वर्ष, रा. प्लॉट नं. 102, राठोड ले आऊट, आनंतनगर, नागपूर 2) अब्दुल मजीद वल्द अब्दुल मोईन षेख, वय 32 वर्षे, रा. झिंगाबाई टाकडी जयदुर्गानगर रेखा राजुरकर यांच्या घरी भाडयाने, नागपूर, 3) रंजना गॅस एजन्सीचे वाहन क्र. एमएच/49/डी/6567 चा चालक नामे मंगेश भिमराव भीमटे, वय 34 वर्ष रा. नजुल ले आउट कॉलनी, अंगुलीमाल बौध्द विहार जवळ, जरीपटका, नागपुर हे घरगुती वापरातील भारत गॅस सिलेंडर व एच.पी.गॅस सिलेंडर मधील गॅस चार चाकी व तीन चाकी LPG गॅस टाकीत माणविय जिवीतास धोकादायक रित्या भरत असतांना मिळुन आले करीता पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे कलम 3, 7 ई.सी.ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करून एकुण 5,67,000 रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर कार्यवाही मा.पोलीस आयुक्त डॉ. श्री. भुषणकुमार उपाध्याय, मा. सह पोलीस आयुक्त श्री. रविंद्र कदम, मा. अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. बि.जी. गायकर, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. संभाजी कदम, सहा. पोलीस आयुक्त श्री. संजीव कांबळे, पोलीस निरीक्षक ए.आय. मुदगल, यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. श्री. पी.डी. अन्नछत्रे, पोउपनि. डि.ओ.पेंडकर, पो.हवा प्रकाष वानखेडे, नापोशी सतिश पांडे, बलजितसिंह ठाकुर, महेश कुरसंगे, पोशि श्याम गोरले, **चालक** पोहवा विजय लेकुरवाळे, पोहवा अरविंद झिलपे यांनी वरिल कारवाही केली आहे.



3) पो.स्टे. हुडकेश्वर पोलीसांची कामगीरी –

फिर्यादी नामें राहूल अविनाश कळमकर वय 31 वर्ष, रा. प्लॉट न. 22, जनेसेवा को ऑपरेटीव्ह सोसायटी, नवीन सुभेदार ले आऊट, हुडकेश्वर रोड नागपूर यांनी पो.स्टे. हुडकेश्वर नागपूर येथे तक्रार केली की चुलत भाऊ विशाल वसंतराव यांचे मालकीचा 10 चक्का ट्रक क्रमांक एमएच/34/ऐ.बी/3672 किंमती 14,00,000 हा त्यांचा ड्रायव्हर नामे धनराज शंकरराव बरगे, वय 25 वर्ष रा. ब्रम्हनगर बहादुरा नागपूर याने दिनांक 10/10/18 रोजी 20.00 वा. दरम्यान त्याच्या खाली प्लॉट मध्ये ट्रक पार्क करून त्याचे जवळच राहते घरी झोपण्यास गेला असता दिनांक 11/10/18 रोजी रात्री 01.00 वा. चे दरम्यान ड्रायव्हरला ट्रकचा आवाज आल्याने त्याने बाहेर येवून पाहीले असता. त्याला ट्रक पार्क केलेल्या ठिकाणी दिसून आला नाही. सदरचा ट्रक कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे. अशा फिर्यादीचे तक्रार वरून पोलीस स्टेशन हुडकेश्वर नागपूर शहर येथे कलम 379 भा.दंवी. अन्वये सपोनी रंजन सावंत यांनी दाखल करून तपास पुढे सुरू केला. सदर ट्रक मध्ये लागलेल्या जी. पी.एस. सिस्टम वरून ट्रकचा बुध्दी चातुर्याने व शिताफिने शोध घेवून आरोपी नामे प्रज्योतसिंग अमरजितसिंग छज वय 41 वर्ष, रा. प्लॉट नं. 22, स्नेहदिप कॉलनी, जरीपटका नागपूर यास गुन्हयात अटक करण्यात आले. व आरोपीचे ताब्यातून 10 चक्का ट्रक क्रमांक एम.एच/34/ऐ.बी/3672 किंमती 14,00,000 हा जप्त करण्यात आला. आरोपी सध्या पोलीस कोठडीत असून आरोपी सोबत गुन्हयात शामील असलेला साथिदार हा फरार असून त्याचा शोध सूरू आहे आणि गुन्हयाचा तपास सूरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क .4 श्री. निलेश भरणे, मा.सहा. पोलीस आयक्त, अजनी विभाग, श्री.आर.एस. धामणेरकर, मा. वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री सत्यवान माने, दुपोनी श्री.किशोर चौधरी, पो.स्टे. हुडकेश्वर यांचे मार्गदर्षनाखाली, सपोनी रंजन सावंत, एस.बी.कदम, पोहवा मनोज नेवारे, पो.ना. परेश दिवटेलवार, अमोल गोरे, महेंद्र, पो.शि. विलास चिंचुलकर, संतोष चौधरी, दिपक, सारंग यांनी कारवाई करून सदरचा गुन्हा 24 तासाचे आत उघडकीस आणून आरोपीस अटक करण्यात आले.

4) पो.स्टे. सोनेगांव पोलीसांची कामगीरी –

फिर्यादी नामे अमोल सुरेश बावनगडे, वय 31 वर्षे रा. हनुमान नगर, सुतगिरनी जवळ वानाडोंगरी, हिंगना रोड, नागपुर हे वर्धा, सावंगी मेघे येथुन दुचाकीने नागपुर च्या दिशेने परत येण्याकरीता निघाले असता खापरी येथे पोहचल्यानंतर मिहान मार्गे हिंगना जातांना एका ईसमाने लिफ्ट मागीतली परंतु तो अनोळखी असल्याने फिर्यादीने त्यास त्याचे नाव पत्ता व मोबाईल क्रमांकं विचारला असता त्याने त्याचे नाव आशिष बहीरम, रा. कारंजा असे सांगीतले व त्याचेकडील मोबाईल वरून फिर्यादीचे मोबाईल वर मिस्ड कॉल केला फिर्यादीस खात्री पटल्यानंतर त्या ईसमास आपल्या दुचाकीवर लिफ्ट देवुन वाडी हिंगनाकडे निघाले. रस्त्यामधे तेल्हारा तलावाचे गेट जवळ पोहचले असता आशिष बहीरम याने लघवी लागल्याचे बहाण्याने गाडी थांबविण्यास सांगीतली वरून फिर्यादीने गाडी थांबविल्यावर त्या ईसमाने त्याचे बॅगमधील स्टीलचा चाकु काढुन फिर्यादीस मारण्याचा धाक देवुन त्याचे ताब्यातील होंडा शाईन क्र. एम.एच/40बी.एन/5338 आकाशी रंगाची किंअं. 30,000 रू.ची जबरदस्तीने हिसकावुन घेवुन पळुन गेला. फिर्यादीचे अश्या रिपोर्ट वरून पोस्टे ला कलम 392 भादंविसं चा गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच पोस्टे चे तपास पथक प्रभारी पोउपनि, ज्ञानेश गोविंद सावंत हे पोस्टे तपास पथकासह आरोपीचे शोध घेत असतांना सायबर सेल नागपुर यांचेकडुन मिळालेल्या तांत्रीक मदतीच्या आधारे फिर्यादीसह पोस्टे बर्डी हद्दीत पोचले असता, बर्डी ते मोरभवन दरम्यान स्टाफ व फिर्यादीसह पायदळ गस्त करीत असतांना फिर्यादीने आरोपीस ओळखले त्याला अशिष नावाने हाक मारताच तो गर्दीचा फायदा घेवुन पळु लागला त्यास सोबत स्टाफचे मदतीने पाठलाग करून मोठ्या शिताफिने घेराव घालुन पकडले. त्यांस त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव आशिष महादेव बहीरम, वय 22 वर्षे रा. जुना बाजार चौक, कारंजा घाडगे, जिल्हा वर्धा असे सांगीतले झडती दरम्यान त्याचेजवळुन एक धारदार चाकु व काही रोख रक्कम मिळाली त्याला अधिक विचारपुस केली असता त्याने धाक धाखवुन हिसकावलेली गाडी अपघात झाल्याने एका झुडपात लपवुन ठेवली होती ती हस्तगत करण्यात आली आहे आरोपी नमुद गुन्हयात ताब्यात घेवुन अटक करण्यात आली

अश्या प्रकारे सोनेगाव तपास पथकाने अवघ्या तीन तासात एका गंभीर गुन्ह्याचे आरोपीला मोठया शिताफिने तांत्रीक मदतीच्या आधारे ताब्यात घेतले.

सदरची कार्यवाही ही मा.पो.उप.आयुक्त परिमंडळ क्र. 1 श्री विवेक मासाळ, सहा.पोलीस आयुक्त श्री अशोक संबळकर, यांचे मार्गदर्षनाखाली वपोनि श्री कोटनाके व पोनि गुन्हे श्री. ताकसांडे यांचे उत्तम प्रतिनिधीत्वा खाली पोउपनि, ज्ञानेश गोविंद सावंत, पोहवा सुनिल, सुभाष पो.षि. अनिल, हिमांशु, संतोष, फहीम, हर्शल यांनी पार पाडली. तसेच सायबर सेल नागपुर यांचेकडुन मिळालेली माहीती ही सदर कामगीरीमध्ये महत्वाचे ठरली.



**5) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कारवाई –**

पाचपावली पोलीसांना गोपनीय माहीती मिळाली की, लष्करीबाग कमाल चौकच्या मागे सखी ब्युटी पार्लर या ठिकाणी नेहमी काही इसम संशयास्पद उभे असतात तसेच सखी ब्युटी पार्लर मध्ये पार्लरच्या नावाखाली अवैध प्रकार चालतात. अशी माहीती मिळाली सदर प्रकाराची शहानिशा करणेकामी फंटर ला गि–हाईक म्हणून पाठविण्यात आले. सदर ठिकाणी रेड केली असता सखी ब्युटी पार्लर चालविणारी महीला सुनीता चंदन खत्री, रा. कपील नगर, एन.आय.टी क्वॅार्टर बी 42, पो.स्टे. जरीपटका, नागपूर ही ब्युटी पार्लरच्या नावाखाली सट्टापट्टी चा अवैध धंदा करताना मिळून आली. सदर महीलेवर महा. जुगार कायदा प्रमाणे कारवाई करण्यात आली.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. 3, श्री राहुल माकणीकर, सपोआ वालचंद्र मुढे, वपोनि नरेंद्र हिवरे, पोनि रविंद्र दुबे यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि पी.आर. इंगळे, नापोशि राजेश देशमुख, विनोद गायकवाड, मपोशि भारती बांते यांनी केली आहे.

**6) शहरातील नाईट राऊंड अधिकारी बाबत :–**

नागपूर शहरात आज दि. 11.10.2018 रोजी मा. पोलीस उप आयुक्त, (वाहतुक) श्री राजतिलक रौशन, हे नाईट राऊंड करणार आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर